महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,जळगांव

श्री गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर,सिरसोली रोड, जळगाव -४२५००२
ईमेल-gacjalgaon@gmail.com

जा.क्र.शाआमवरुज/भांडार/COVID-DPDC खरेदी/ ९०७ /२०२० दिनांक - 10 JUN 2021

**दरपत्रक सुचना**

**प्रति,**

--------------------------------

--------------------------------

विषय :- **यंत्रसामुग्री/उपकरणे/ साहित्य खरेदीकरणेकरिता दरपत्रके सादर करणेबाबत**

मा. जिल्हाधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती, जळगांव यांचेकडून कोवीड-१९ अंतर्गत तसेच DPDC फंडामधुन प्राप्त झालेल्या अनुदानातुन या महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयाकरिता सोबतच्या यादीतील नमुद तपशिलानुसार यंत्रसामुग्री/उपकरणे/ साहित्य खरेदीसाठी विहित वेळापत्रकानुसार संबधित पुरवठादाकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक व पात्र पुरवठादारांनी त्यांची कमीत कमी दरांची दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय जळगांव यांचे कार्यालयात पोस्टाने अथवा समक्ष खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

| क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | **दि ११.०६.२०२१ ते दि १९.०६.२०२१** सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| 2 | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२२.०६.२०२१** रोजी दुपारी २.०० वा.. |
| 3 | दरपत्रक उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, द्वारा श्री. गुलाबराव देवकर अभियांत्रिकी महाविद्यालय परिसर, सिरसोली रोड, जळगांव. ४२५००१. |

**अटी व शर्ती**

१. दिनांक १९-०६-२०२१ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रकाच्या पाकीटावर **यंत्रसामुग्री/उपकरणे/ साहित्य खरेदी (भाग १ अथवा भाग २) दरपत्रक सादर करणेबाबत** असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये.

४. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेटस्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. (**हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे** )

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. दरपत्रकासोबत GST, Pan Card, Shop Act Licence, renewal etc. प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.